सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १८५ | शनिवार, दि. २८ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com



अमळनेर : मुंबईमधील माटुंगा येथील श्री षण्मुखानंद हॉल (आडिटोरियम) येथे गुरुवारी झालेल्या नृत्य–नाटिका–संगीत रामायणाच्या प्रयोगावेळी व्यासपीठावर अमळनेर येथील मूळ रहिवासी इंजिनिअर तथा या नाटिकेचे लेखक–दिग्दर्शक संजय महाले यांच्या समवेत नाटिकेतील विविध भूमिका साकारणारे कलावंत. (सर्व छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

## श्रीराम नवमीला अमळनेरकरांना
# मुंबईत साक्षात रामायणाचा लाभ
### अमळनेरकर महालेंची भारताच्या इतिहासातील पहिलीच नृत्य–नाटिका–संगीत रामायण महाप्रस्तुती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


अमळनेर : येथील मूळ रहिवासी इंजिनिअर उल्हास ऊर्फ संजय महाले लिखित व दिग्दर्शित नृत्य–नाटिका एवम संगीत रामायणाचा श्रीराम नवमीला अर्थात २६ मार्च रोजी मुंबई येथील माटुंगा भागातील सर्वांत भव्य असलेल्या श्री षण्मुखानंद हॉल (ऑडिटोरियम ) येथे अतिभव्य प्रयोग झाला. असा प्रयोग यापूर्वी भारतीय रंगमंचावर कधी झालेला नव्हता, हे विशेष...! त्यातही विशेष म्हणजे महाराज दशरथाच्या भूमिकेत प्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते महेश मांजरेकर तर रावणाच्या भूमिकेत ख्यातनाम अभिनेते पुनीत इस्सर होते. प्रभू श्रीरामांच्या भूमिकेत हिमांशू सोनी, हनुमानजींच्या भूमिकेत केतन करंडे, लक्ष्मणाच्या भूमिकेत कुणाल फडके, सीता मातेच्या भूमिकेत गौरी इंगवले यांच्या प्रमुख भूमिका होत्या. स्वप्नील राजशेखर यांनी महर्षींची भूमिका केली होती, तर समीरा गुजर यांनी श्रीरामांच्या मातेची अर्थात कौशल्याची भूमिका केली होती. प्रख्यात संगीतकार नितीन शंकर यांनी संपूर्ण नाटिका स्वरबद्ध व संगीतबद्ध केली होती. गायिका सावनी रवींद्र व गायक नचिकेत देसाई यांनी अफलातून गीते सादर केली होती.

हा प्रयोग पाहण्यासाठी अमळनेर येथून मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, आनंद महाले, नगरसेवक विजय कहारू पाटील, व्यापारी महेश कोठावदे, भगवती टी स्टॉलचे संचालक बाळासाहेब अशोक पाटील, मंगल सेवेकरी सौ. आशाताई महाले, पुषंद ढाके, अनिल कदम, चंद्रकांत महाजन, आशिष चौधरी, ए. डी. भदाणे, दत्तात्रय पवार, राजेंद्र बिऱ्हाडे, मुंबई येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक अमोल पाटील, के. जे. सोमय्या महाविद्यालय, विद्याविहार, मुंबई येथील प्रा. संदीप पाटील, माजी सैनिक स्वप्नील शिरसाठ, जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी, रेडिओ एफ–एम मंगलध्वनीचे अजय पाटील, अकौंटंट योगेश पाटील, दै. 'ग्लोबल महातेज'चे कार्यकारी संपादक भरत पाटील, ब्युरो चीफ रजनीकांत पाटील, मुख्य आर्टिस्ट समीर सांगळे, सेवेकरी संजीव बिऱ्हाडे, संजय सोनवणे, ऋत्विक पाटील, संदीप पाटील आदी उपस्थित होते. सर्वांनी या नाटिकेचा मनमुराद आनंद लुटला. हॉल खच्चून भरलेला होता. शो हाऊसफुल्ल असल्यामुळे अनेकांना नाराजीने परतावे लागले. दर दहा ते पंधरा मिनिटांत टाळ्यांचा प्रचंड कडकडाट होत होता. याबाबत दै. 'ग्लोबल महातेज'ने अनेकांच्या प्रतिक्रिया घेतल्या असता सर्वांनी नाटिकेचे तसेच लेखक व दिग्दर्शक संजय महाले, संगीत दिग्दर्शक नितीन शंकर, डिजिटल डायरेक्टर मिहीर महाले व महेक महाले यांचे मनसोक्त कौतुक केले. अनेकांनी तर आम्ही निःशब्द आहोत. रामायणातील अनेक माहीत नसलेल्या गोष्टींचा उलगडा झाला. इतका सुंदर कार्यक्रम आणि तोही श्रीराम नवमीला अनुभवाला मिळाला, याबद्दल खूप धन्यता व्यक्त केली. अनेक भावुकप्रसंगी उपस्थितांचे डोळे पाणावत होते. ज्यांनी हा कार्यक्रम पाहिला त्यांनी 'आम्ही धन्य झालो' या शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त केली.
















नाट्यप्रयोगावेळी कला सादर करताना दिग्गज अभिनेते, संगीतकार व वाद्य वादक यांच्यासह गायक.




**नाट्यप्रयोगावेळी आपल्यातील कला सादर करताना विविध कलावंत.**

आमच्या अमळनेरचा सुपुत्र व आमच्या मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांचे लहान बंधू अर्थात मुंबई महापालिकेचे निवृत्त उपायुक्त तसेच हॅपी– लकी इंटरटेनमेंटच्या माध्यमातून जगप्रसिद्ध अतिभव्य संगीत शोचे निर्माते–निर्देशक असलेले संजय महाले यांनी आता सांस्कृतिक क्षेत्रातील अत्यंत आव्हानात्मक असलेल्या संगीत नाटिका या नवीन क्षेत्रात प्रवेश केला आहे. ज्या दमदार पद्धतीने आणि एकापेक्षा एक दिग्गज कलावंतांना सोबत घेऊन श्री. महाले यांनी रामायण रंगमंचावर सादर केले. त्यास शब्दबद्ध करणे केवळ अशक्य आहे. अमळनेरच्या मातीचा सांस्कृतिक सुगंध श्री. महाले यांच्यामुळे संगीतविश्वासोबतच आता सिने आणि नाट्यक्षेत्रातही दरवळतो आहे. अमळनेरचा सांस्कृतिक झेंडा राजधानीवर डौलाने फडकतो आहे, याचा एक अमळनेरकर म्हणून आम्हाला सार्थ अभिमान आहे.

– **एस. बी. बाविस्कर** सचिव, मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर तथा जळगाव जिल्हाध्यक्ष, भाजप तीर्थक्षेत्र विकास आघाडी.




नाट्यप्रयोगाचे साक्षीदार होणाऱ्या सामान्य श्रोते–प्रेक्षकांसाठीची तसेच अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठीची प्रवेशिका.




नाट्यप्रयोग पाहिल्यानंतर श्री षण्मुखानंद हॉलबाहेर एकत्रित आलेले अमळनेरकर.



## आजचे अभीष्टचिंतन





श्री. सुरेश पाटील
अमळनेर



श्री. एच. टी. नंदवे सर
अमळनेर



श्री. मिथुन दीक्षित
अमळनेर

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

## नांदुरी गडासाठी जादा बसगाड्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : उत्तर महाराष्ट्राची आराध्य दैवत व कुलस्वामिनी असलेल्या सप्तशृंगी गडावर गुरुवार, दि. २६ मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत होणाऱ्या चैत्रोत्सवासाठी राज्य परिवहन महामंडळ सज्ज आहे. या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सोयीसाठी शुक्रवार, दि. २७ मार्चपासून अमळनेर व पारोळा तालुक्यातील भाविकांसाठी नांदुरी गड येथे जाण्यासाठी अमळनेर आगारामार्फत जादा बससेवेची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. या निर्णयामुळे भाविकांना प्रवास सुलभ होणार असून, त्यांना दिलासा मिळणार आहे. कोणत्याही गावातून थेट नांदुरी गडासाठी किमान ४० प्रवासी उपलब्ध असल्यास त्या गावातून थेट बस सोडण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील भाविकांनाही सोयीस्कर प्रवासाची सुविधा मिळणार आहे.

या विशेष बससेवेत राज्य परिवहन महामंडळाच्या (रा.प.) सर्व सवलती लागू असतील. राहणार असून विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व प्रवाशांना त्याचा लाभ घेता येणार आहे.

## संपादकीय

# बिरबल आणि बांगलादेशी

मुंबई उच्च न्यायालयाने सर्व फेरीवाल्यांची सखोल पडताळणी करण्याचे आदेश दिले आहेत. बेकायदा बांगलादेशी फेरीवाल्यांना मायदेशी पाठविण्याचे आदेश महत्त्वाचे आहेत. अधिकृत फेरीवाल्यांव्यतिरिक्त इतर सर्व फेरीवाले बेकायदा ठरतील. बिरबलाच्या अनेक चातुर्यकथा प्रसिद्ध आहेत. 'आपल्या राज्यात किती कावळे आहेत?', असा प्रश्न एकदा अकबर बादशहाने बिरबलास केला. त्यावर बिरबलाने काही एक आकडा सांगितला. 'प्रत्यक्ष आकडा त्यापेक्षा कमी-अधिक भरल्यास काय?' या बादशहाच्या प्रश्नावर बिरबलाचे चतुर उत्तर : 'कमी भरल्यास आपल्या राज्यातील कावळे बाहेर गेले आहेत, आणि अधिक भरल्यास बाहेरच्या राज्यातील कावळे आपल्या राज्यात आले आहेत, असे खुशाल समजावे'. बिरबलाच्या या उत्तराने बादशहाचे समाधान झाले असेलही कदाचित; पण, मुंबईतील फेरीवाल्यांच्या आकड्याच्या संदर्भात आणि त्यातही बेकायदा फेरीवाल्यांवरील कारवाईच्या संदर्भात मुंबई महानगरपालिका आणि पोलिस यांच्या वतीने जी उत्तरे देण्यात येत आली आहेत, त्यावर मुंबई उच्च न्यायालयाचे समाधान झाले नसावे. म्हणूनच, 'मुंबईतील बेकायदा बांगलादेशी फेरीवाल्यांसह सर्वच फेरीवाल्यांची सखोल पडताळणी करा,' असे आदेश न्यायालयाने मुंबई महापालिका व पोलिसांना दिले आहेत. 'या पडताळणीत बांगलादेशी वा इतर विदेशी फेरीवाले मुंबईत बेकायदा राहात असल्याचे आढळल्यास त्यांची त्यांच्या मायदेशी रवानगी करा,' हा या आदेशातील कळीचा मुद्दा. हे असे आदेश दिल्याबद्दल मुंबईकर आणि मुंबईच्या बाहेरून रोज नोकरी-व्यवसायासाठी मुंबईत येणारे लक्षावधी नागरिक उच्च न्यायालयाचे आभार मानतील हे नक्की.

पूर्वीच्या काळच्या संस्कृती नद्यांच्या काठाने वाढल्या, तद्वत आत्ताच्या शहरी संस्कृती या रेल्वेमार्गांच्या काठाने वाढल्या आणि फोफावल्या. यात फेरीवाला हा घटक कमालीच्या वेगाने वाढत गेला. हा घटक रोजच्या जगण्यासाठी अत्यंत आवश्यकच. मात्र त्यास काही नियमनही गरजेचे. पण आपल्याला एकूणच नियमनाचे वावडे. आणि ज्यांच्यावर नियमनाची जबाबदारी अशा 'व्यवस्थां'चे वेगळेच साटेलोटे चाललेले. त्यातून केवळ मुंबईतच नव्हे, तर ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर अशा अनेक मोठ्या शहरांत बेकायदा फेरीवाल्यांची समस्या उभी राहिली. फेरीवाल्यांनी व्यापलेले पदपथ, त्यांची बेकायदा कच्ची-पक्की बांधकामे, त्यांची संघटित दादागिरी, परिणामी वाहनांची कूर्मगती... या सगळ्या चक्रव्यूहातून कसेबसे वाट काढणारे नागरिक हे रोजचे चित्र. मुंबईचे उदाहरण घेतले तर ९९ हजार ४३५ फेरीवाले अधिकृतरीत्या व्यवसाय करू शकतात, असे न्यायालयीन आदेश सांगतात. मात्र प्रत्यक्षात आज मुंबईतील फेरीवाल्यांची संख्या तीन लाख २६ हजार ६०४ फेरीवाले इतकी असावी, असे सांगण्यात येते. मुद्दा निव्वळ संख्येचा नाही, तर त्यातून फोफावणाऱ्या बेदरकार संस्कृतीचा, कायदा-सुव्यवस्थेचा आणि महसुली नुकसानीचा देखील आहे. त्यामुळेच उच्च न्यायालयाने दिलेले आदेश महत्त्वाचे ठरतात. सोबतच मुंबई महापालिकेने निवडणुकीद्वारे निवडलेली शहर फेरीवाला समिती वैध असल्याचा निर्वाळाही तितकाच महत्त्वाचा. या आदेशानंतर फेरीवाला कायद्याची अंमलबजावणी होण्यातील अडथळे दूर होतील, ही आशा.

सामान्यांच्या दृष्टीने या आदेशातील सर्वाधिक अधोरेखित झालेला मुद्दा बेकायदा बांगलादेशी फेरीवाल्यांचा. भारतात बेकायदा राहणाऱ्या बांगलादेशींचा मुद्दा पार अगदी पश्चिम बंगाल, ईशान्येकडील राज्यांपासून ते मुंबईसह महामुंबईपर्यंत अतिशय संवेदनशील झालेला आहे. त्यास धार्मिक रंग आहे का? तर आहेच. आणि आत्ताच्या राजकीय भोवतालात तो गडददेखील झालेला आहे. पण कुणी त्यास धार्मिक रंग देत असेल, म्हणून ती समस्या गौण ठरत नाही, याची खूणगाठ सगळ्यांनीच मनाशी बांधायला हवी. आणि म्हणूनच वेळप्रसंगी कठोर पावले उचलून ती समस्या सोडवायलादेखील हवी. पण दुर्दैवाने अशा प्रकारच्या विषयांवर दोन्ही बाजूंनी राजकारण होत राहते, सुरक्षित व हक्काच्या मतपेढीच्या अंगाने अ-विचार होतो नि मूळ मुद्द्याला भलते वळण लागते, हे अनेकदा दिसून आले आहे. तसे आता होऊ नये. या सगळ्यांत एक महत्त्वाची गोष्ट सगळ्यांनीच ध्यानात ठेवावी अशी. न्यायालयाने दिलेल्या आदेशांनुसार सर्वच फेरीवाल्यांची पडताळणी होईल; त्यात 'बेकायदा बांगलादेशी' समजून येतील; तसेच 'बेकायदा बिगर बांगलादेशी'देखील. म्हणजेच, 99 हजार 435 फेरीवाले वगळता इतर सारेच फेरीवाले हे 'बेकायदा'च असतील. हे सारेच बेकायदा फेरीवाले हटवण्यास न्यायालयाने सांगितलेले आहे. त्यामुळे त्यांच्यावरही कारवाई होणे अनिवार्य, अपरिहार्य. त्यातही उद्या कुणी राजकारण आणू नये; अन्यथा न्यायालयाच्या आदेशाचा मूळ हेतूच केरात जायचा. बिरबल-बादशहाच्या कथांमधील बिरबलाची उत्तरे चतुर असतीलही; पण बांगलादेशींच्या या मुद्द्यावर तसली चतुर उत्तरे कामाची नाहीत. येथे हवी आहे ती ठोस कारवाई. ती व्हावी, ही अपेक्षा.

# आमदार अनिलदादांनी स्वखर्चातून उभारले गतिरोधक

## नागरिकांना दिलासा; दाजीबा नगरातील महिलांच्या आंदोलनाला यश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील गलवाडे रस्त्यावरील दाजीबा नगरजवळ अपघातांचे प्रमाण वाढले आहे. या पार्श्वभूमीवर परिसरातील महिलांनी वेळावेळी आंदोलन केले होते. मात्र, तरीही सार्वजनिक बांधकाम विभागाचे दूर्लक्ष होते. अखेर आमदार अनिलदादा पाटील यांनीच गांभिर्य लक्षात घेऊन स्वखर्चातून गतिरोधकाचे काम सुरू केले आहे. त्यामुळे परिसरातील महिलांसह नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. त्यांनी आमदार अनिलदादा पाटील यांचा ऋणनिर्देश केला आहे. गुरुवार, दि. २६ मार्च रोजी गतिरोधकाच्या कामास सुरुवातही झाला आहे.

रविवार, दि. १५ मार्च रोजी दाजिबा नगरजवळ एका महिलेचा दुर्दैवी अपघाती मृत्यू झाला होता. या घटनेनंतर संतप्त महिलांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात धरणे आंदोलन केले होते. त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात कामाला विलंब होत असल्याने महिलांनी थेट आमदार अनिलदादा पाटील यांच्याकडे कैफियत मांडली होती. आमदार अनिलदादा पाटील यांनी गांभीर्याने दखल घेत आठ दिवसांच्या आत गतिरोधक उभारण्याचे आश्वासन दिले होते. या पार्श्वभूमीवर गुरुवार, दि. २६ मार्च रोजी आर. बी. कन्स्ट्रक्शन मार्फत प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली आहे. परिसरातील नागरिकांनी याबद्दल समाधान व्यक्त करत आमदारांच्या तत्परतेचे कौतुक केले.

दरम्यान, काम सुरू असताना काही राजकीय कार्यकर्त्यांनी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला. स्थानिक महिलांनी सुरक्षिततेच्या प्रश्नावर राजकारण करू नये, तसेच फुकटचे श्रेय घेऊ नये अशी भूमिका स्पष्टपणे मांडली. महिलांमध्ये व काही कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक चकमकही उडाली. मात्र, महिलांसह नागरिकांचा आक्रम पावित्रा पाहून संबंधितांनी तेथून काढता पाय घेतला. यावेळी सौ. नूतन पाटील, आशा नामदेव पाटील, निर्मला अरविंद पाटील, संगीता कापडणे, सुरेखा पाटील, सरला पाटील, नेहा परदेशी, तृप्ती डहाके, वैशाली पाटील, योजना पाटील, ज्योती पवार, रेखा चंद्रकांत पाटील, रेखा भागवत, मानसी पाटील, बबिता झिम्बल, पुरुषोत्तम पाटील, अशोक पाटील, सुमेरसिंह पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. परिसरातील नागरिकांनी आता या रस्त्यावर कायमस्वरूपी वाहतूक नियंत्रण उपाययोजना, फलक आणि प्रकाशव्यवस्था उभारण्याची मागणीही केली आहे.



*अमळनेर : आमदार अनिलदादा पाटील यांच्या स्वखर्चातून उभारण्यात येत असलेल्या गतिरोधकाच्या कामाच्या शुभारंभप्रसंगी उपस्थित असलेल्या दाजिबानगर परिसरातील महिला.*

# प्रबुद्ध विहारात सम्राट अशोक जयंती उत्साहात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : समता सैनिक दलातर्फे जंबुद्वीपचे निर्माता, शांतता आणि अहिंसेचा संदेश देणारे राजा चक्रवर्ती सम्राट अशोक यांची २३३० वी जयंती येथील प्रबुद्ध विहारात उत्साहात झाली. यावेळी समाजातील विविध स्तरांतील मान्यवर उपस्थित होते. समता सैनिक दलाचे जळगाव जिल्हा (पश्चिम) प्रमुख सुनील करंदीकर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सम्राट अशोकांनी दिलेल्या धम्मविजयाचा आणि कल्याणकारी राज्याचा वारसा आजच्या काळातही कसा प्रेरणादायी आहे, यावर प्रकाश टाकला. भारतीय दलित साहित्य अकादमीचे जिल्हाध्यक्ष अतुल डोळस यांनी सम्राट अशोकांच्या प्रेरणादायी कार्याबद्दल मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यकर्ते हृदयनाथ मोरे, भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी आनंदा सोनवणे, केंद्रीय शिक्षक सिद्धार्थ सोनवणे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

**उपासक-उपासिकांचा प्रतिसाद**

जयंतीनिमित्त प्रबुद्ध कॉलनीतील बौद्ध उपासक आणि उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदनेने झाली. उपस्थितांनी सम्राट अशोक यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. समता सैनिक दलाच्या शिस्तबद्ध आयोजनामुळे हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.



# आकर्षित करणारा तितर

पक्ष्यांची ओळख

**नाव :** तितर Partridge
**रंग :** पाठ तपकिरी, पोट पिवळे, पोटावर आणि गळ्यावर काळे पट्टे,पाय फिकट लाल.
**चोच :** लहान, काळी, टोकदार.
**डोळे :** हान, तेजस्वी, तपकिरी, डोळ्या भोवती लालसर वलय असते.
**घरटे :** तितर गवताळ प्रदेशात राहतो. तेथे जमिनीवर गवत, पाने व पिसांचे घरटे बांधतो. या पक्षाचे घरटे झाडावर नसते.
**अंडी :** मादी मे महिन्यात चार ते सहा अंडी घालते. त्यांचा रंग फिकट तपकिरी असतो.
भक्ष : तितर धान्य, गवतातील बिया, किटक, अळ्या खातो. तो कोंबडी प्रमाणे पायाने माती उकरून भक्ष शोधतो.
**आवाज :** तितरचा मोठा असतो. आपल्या जोडीदारांना अन्न किंवा संकट कळविण्यासाठी मोठ्याने ओरडतो. संध्याकाळी तितरचा कॉल आवश्य ऐकू येतो.

**इतर वैशिष्ट्ये :** तितर गुबगुबित पक्षी आहे. तितरची मोठ्या प्रमाणावर शिकार होत असल्यामुळे व किटकनाशकांमुळे संख्या कमी होत आहे. या पक्ष्याची उडण्याची क्षमता कमी आहे. तितरची शिकार करणे वन्यजीव संरक्षण कायद्या अंतर्गत गुन्हा आहे. हा पक्षी थव्यात राहतो. भारतभर आढळतो. अमळनेरला श्री मंगळग्रह मंदिराच्या पुढील माळरानावर, डुबकी मारूती भागात, बरड्या हनुमान गवताळ पट्ट्यात व शेतांमध्ये दिसतो.

संग्राहक : प्रा. प्रकाश धर्माधिकारी
निसर्ग मित्र मंडळ,अमळनेर

**संग्राहक : प्रा. प्रकाश धर्माधिकारी**
निसर्ग मित्र मंडळ, अमळनेर.




*मंगरुळ (ता. अमळनेर) : भाविकांना मोफत औषधी वाटप करताना सपत्निक संजय मालविया. डावीकडून येजदी भरुचा, बाळू कोठारी, रवींद्र कालरा, योगेश मुंदडा, डॉ. संदीप जोशी, विनोद अग्रवाल, प्रदीप जैन, सुभाष चांडक, जितेंद्र पारख, महेंद्र पाटील, नितीन विंचुरकर आदी.*

# भारताचे वय आता ७९ वर्षे...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या भारत देशाचे वय ७९ वर्षाची झाले आहे. लवकरच आपण आपल्या देशाचा सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा आयोजित करू शकतो. मात्र, या स्वातंत्र्याच्या ७९ वर्षात आपली परिस्थिती तशी फारशी बरी दिसत नाही. आक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या " वेलबिईंग रिसर्च सेंटरने" प्रकाशित केलेल्या २०२६ च्या अहवालात भारताचा १४० देशांपैकी ११६ वा क्रमांक लागला आहे...दोन क्रमांकावर आला बरे!
फिनल्यांड हा सलग नवव्यांदा जगातील सर्वानंदी देश ठरला आहे. पांच प्रमुख निकषांनुसार संपत्ती- समृध्दी, वितरण-समता, जन- संरक्षणक्षमता, कल्याणकारी- व्यवस्था आणि उत्तम- आयुर्मान याबाबत आपण कुठे आहोत? जसे समाजात आपण खाली खाली जातो, खालच्या थरापर्यंत पोहोचतो तिथे या पाचने कशाचा लांब- लांबपर्यंत संबंध दिसत नाहीत. या निकषांपर्यंत पोहोचण्यासाठी या घटकांना अनेक काळजोटावा लागणार आहे. मात्र, त्यासाठी जर सर्वांनी एकत्रितपणे सामूहिक प्रयत्न केले तर हा काळ थोडा कमी होऊ शकेल. शहरी वस्त्यांमध्ये व ग्रामीण क्षेत्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी हे निकष लावून - " आनंदी शहरं - आनंदी गावं " असे अभियान राबवले तर आपण २०२७- २८ ला पहिल्या शंभर मधे तरी येऊ शकतो. मात्र, त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना तसं स्वातंत्र्य दिले पाहिजे.

आपली गावे तरी जरा स्वतंत्र आहेत. मात्र, ही कुपोषित शहरे आज पूर्णपणे परावलंबी बनले आहेत. सर्वानंदी देश बनवायचा तर सर्वानंदी विकेंद्रीत स्वराज्यं बनली पाहिजेत!

**- डॉ. भारती पाटील, आधार संस्था, अमळनेर.**

# गडावर जाणाऱ्या भाविकांना 'लायन्स'तर्फे मोफत औषधी वाटप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रीराम नवमीपासून गडावर जाणाऱ्या भाविकांच्या गुरुवार, दि. २६ मार्च रोजी शहरातून सवाद्य भव्य मिरवणुक निघाल्या. या पार्श्वभूमीवर लायन्स क्लबतर्फे तालुक्यातील मंगरूळजवळील ग्यानी ढाबा परिसरात सेवा प्रकल्प राबविण्यात आला. अकोला येथील संजय माविया, सुभाष चांडक यांनी अमळनेर येथे भेट दिली. त्यांच्या हस्ते सेवा प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आले. यावेळी लायन्स क्लबतर्फे भाविकांना मोफत औषधी व शितपेय वाटप करण्यात आले. सायंकाळी ६ वाजता सुरू झालेल्या या उपक्रमात भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. लांब पल्ल्याचा पायी प्रवास करताना होणारा शारीरिक त्रास कमी करण्यासाठी या उपक्रमाने भाविकांना मोठा आधार मिळणार आहे.

लायन्स क्लबतर्फे दरवर्षीद हा उपक्रम राबविण्यात येतो. याप्रसंगी लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. संदीप जोशी, सेक्रेटरी महेंद्र पाटील, खजिनदार नितीन विंचूरकर, प्रोजेक्ट चेअरमन जितेंद्र पारख यांच्यासह दिलीप गांधी, पंकज मुंदडा, रजनीश सासनानी, प्रशांत सिंघवी, बाळू कोठारी, रवींद्र कॉलरा विनोद अग्रवाल, योगेश मुंदडा, नीरज अग्रवाल, येजदी भरुचा, प्रदीप अग्रवाल, राजू नांढा, प्रदीप जैन, मनिष जोशी, शेखर धनगर आदींसह सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*अमळनेर : पाणपोईचे उद्घाटन करताना नगरसेवक सचिन पाटील. शेजारी प्रताप साळी, चंदूसिंह परदेशी, विजय सूर्यवंशी, धनराज पाटील, शिवदास शेटे, रामकृष्ण पाटील, जयदीप राजपूत, प्रवीण पाटील, अंकुश पाटील आदी.*

# खासदार स्मितातार्इ वाघ यांच्या वाढदिवसानिमित्त पाणपोईचे उद्घाटन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : प्रभू श्रीराम नवमीचे औचित्य साधून खासदार स्मितातार्इ वाघ यांच्या वाढदिवसानिमित्त आजी- माजी सैनिकांच्या खान्देशी रक्षक फाउंडेशनतर्फे गुरुवार, दि. २६ मार्च रोजी पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले.
नागरिकांना शुद्ध व थंड जारचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. या पाणपोईचा लाभ ग्रामीण भागातून येणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी, शेतकरी बांधव तसेच गोरगरीब व गरजू नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होत आहे. शविआचे नगरसेवक सचिन बळवंत पाटील यांच्या हस्ते पाणपोईचे उद्घाटन झाले. यावेळी नगरसेवक प्रताप साळी, माजी नगरसेवक चंदूसिंह परदेशी यांच्यासह खान्देश रक्षक फाउंडेशनचे अध्यक्ष विजय सूर्यवंशी, शहराध्यक्ष धनराज पाटील, माजी सैनिक शिवदास शेटे, रामकृष्ण पाटील, जयदीप राजपूत, प्रवीण पाटील, अंकुश पाटील, श्री. रोकडे, प्रकाश परदेशी, अकील शेख आदींसह असंख्य आजी- माजी सैनिक उपस्थित होते.

# दुधी भोपळ्याचे चमत्कारीक फायदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दुधी भोपळा भारतात अत्यंत प्रचलित आणि पौष्टिक भाजी आहे. याला लौकी, घिया, दूधी असेही म्हणतात. इंग्रजीत याला बोटल गार्ड म्हणतात. दुधी भोपळा हलका, सहज पचणारा आणि शरीराला थंडावा देणारा मानला जातो. आयुर्वेदातही तो आरोग्यासाठी अत्यंत लाभदायक सांगितला आहे. यामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त आणि कॅलरी कमी असल्यामुळे तो आजारी आणि निरोगीदोघांसाठीही उपयुक्त आहे.

**शरीरात ताजेपणा राखतो**

दुधी भोपळ्यात सुमारे ९० टक्के पाणी असते, त्यामुळे शरीर हायड्रेट राहते. **उन्हाळ्यात सेवन केल्यास :** शरीराला थंडावा मिळतो, थकवा कमी होतो, उष्माघातापासून बचावास मदत होते.

**वजन कमी करण्यास सहाय्यक**

दुधी भोपळा कमी कॅलरी आणि जास्त फायबरयुक्त आहे. पोट जास्त वेळ भरल्यासारखे वाटते. जास्त खाण्याची इच्छा कमी होते. मेटाबॉलिझम सुधारतो. म्हणून वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी ही भाजी उत्तम मानली जाते.

**पचनसंस्था मजबूत ठेवतो**

दुधी भोपळा हलका व सहज पचणारा आहे. बद्धकोष्ठतेत आराम, गॅस व आम्लपित्त कमी करण्यात मदत, आतड्यांची स्वच्छता राखण्यास सहाय्य, दुधीचा रस किंवा हलकी भाजी पोटाच्या त्रासात विशेष फायदेशीर ठरते.

**मधुमेहात लाभदायक**

दुधी भोपळ्याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो, त्यामुळे रक्तातील साखर झपाट्याने वाढत नाही. ब्लड शुगर नियंत्रणात मदत, आवश्यक पोषण पुरवठा होतो.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com





# कोणत्याही कोचिंगशिवाय यूपीएससी क्रॅक

## अवघ्या २३ व्या वर्षी आयएएस; कस्तुरी पांडा यांचा प्रेरणादायी प्रवास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयएएस कस्तुरी पांडा यांनी वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी यूपीएससी परीक्षा पास केली आहे. त्यांनी आपले स्वप्न पूर्ण केले. पहिल्या प्रयत्नात अपयश मिळाल्यानंतरही त्या डगमगल्या नाही.

**आयएएस कस्तुरी पांडा यांचा प्रेरणादायी प्रवास**

यूपीएससी ही देशातील सर्वांत अवघड परीक्षा आहे. यूपीएससी परीक्षा पास करण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते. अनेकजण कोचिंग क्लासेस लावून परीक्षेचा अभ्यास करतात. दिवसरात्र अभ्यास करून अनेक तरुण यूपीएससी परीक्षेत यश मिळवितात. परंतु काही तरुणांनी कोणत्याही कोचिंगशिवाय यूपीएससी परीक्षा पास केली आहे. यामध्ये ओडिशाच्या कस्तुरी पांडा यांचेही

**सक्सेस स्टोरी**

नाव आहे.

**अवघ्या २३ व्या वर्षी आयएएस अधिकारी**

कस्तुरी पांडा यांनी वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी यूपीएससी परीक्षा पास केली आहे. त्यांनी ऑल इंडिया रँक ६७ प्राप्त केली आहे. त्यांनी आपले आयएएस होण्याचे स्वप्न पूर्ण केले. कस्तुरी पांडा या मूळच्या ओडिशाच्या रहिवासी आहेत. त्यांनी एनआयटी राउरकेला येथून कॉम्प्युटर सायन्समध्ये बी.टेक केले. अभियांत्रिके शिक्षण घेत असतानाच त्यांना प्रशासकीय सेवेत जाण्याची इच्छा झाली. त्यांनी नोकरी न करता यूपीएससी परीक्षा देण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयात कुटुंबानेही त्यांना साथ दिली.

**पहिल्या प्रयत्नात अपयश**

कस्तुरी यांनी पहिल्या प्रयत्नान मेन्स परीक्षा पास केली. परंतु मुलाखतीत त्यांना अपयश मिळाले. परंतु त्यांनी या अपयशाने हार मानली नाही. त्यांनी ओडिशा राज्य सेवा आयोगाची परीक्षा दिली. त्यांनी या परीक्षेत राज्यात १४ वी रँक मिळविली. मात्र, त्यांचे आयएएस होण्याचे स्वप्न होते. कस्तुरी पांडा यांनी पुन्हा एकदा यूपीएससी परीक्षेची तयारी केली. त्यांनी सेल्फ स्टडी केली. त्यांनी आपल्या जिद्दीच्या या सातत्याच्या जोरावर यूपीएससी परीक्षा पास केली आहे. त्यांचा हा प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.

# शिवराज्याभिषेक करणाऱ्या गागाभट्टांचे वंशज आता काय करतात?

### त्यांनी जपलेली छत्रपती शिवाजी महाराजांच्या हस्ताक्षरातील पत्रे पाहिलीत का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



पैठणच्या एका कुटुंबाकडे छत्रपती शिवाजी महाराजांची मूळ हस्तलिखित पत्रे आजही जतन केलेली आहेत. ११ पिढ्यांचा हा शिवकालीन अनमोल वारसा इतिहास प्रेमींसाठी खरा खजिना आहे. पैठण म्हणजे जणू काय देशाची दक्षिण काशी. या प्राचीन नगरीत एका साध्या गल्लीत एक मोठा ऐतिहासिक खजिना दडलेला आहे. नाथमंदिराच्या रस्त्यावरची कावळे गल्ली. तेथे राहतात प्रकाश कावळे. त्यांच्या घरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या हस्ताक्षरांचे मूळ पत्रे आजही जपून ठेवलेली आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांनी लिहिलेले हस्तलिखित पत्र शिवरायांचे राज्याभिषेक सोहळा १६७४ मध्ये झाला. त्याचे पौरोहित्य पैठणचे गागाभट्ट कावळे यांनी केले. कावळे घराणे गागाभट्टांचे वंशज असून, राज्याभिषेकानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी गोविंद भट यांना पैठणचे उपाध्येपण बहाल केले होते. तेव्हापासून भोसले घराणे आणि कावळे परिवारात पत्रव्यवहार सुरू झाला. हा सिलसिला २४० वर्षांपर्यंत चालला. शिवाजी महाराजांपासून हरजी भोसले (१६७६ ते १८५०) पर्यंत. छत्रपती संभाजी महाराजांनी लिहिलेले हस्तलिखित पत्र कावळे परिवाराच्या ११ पिढ्यांनी हा वारसा जिवापाड जपला. आज प्रकाश कावळे हे त्याचे रक्षक आहेत. त्यांच्या संग्रहात शिवाजी महाराजांचे एक पत्र आहे मोडी लिपीत लिहिलेले. त्यात म्हटले आहे, 'पैठणचे उपाध्ये म्हणून कावळे यांना मान्यता आहे. भोसले वंशज तीर्थयात्रेला आले तर त्यांना वंशावळ दाखवावी.' छत्रपती संभाजी महाराजांचेही पत्र आहे. १० ओळींचे १६८९ चे. त्यात स्पष्ट लिहिले, 'पैठणला आलो तर शहाजीराजे आणि शिवाजीराजे यांची पत्रे दाखवा, नाहीतर उपाध्येपद रद्द!' राजमुद्रा नसली तरी 'मर्यादयं विजयते' ही मर्यादा मुद्रा आहे.

हस्तलिखितांचे संग्रहक प्रकाश कावळे याशिवाय मानकोजीराजे, परसोजीराजे, व्यंकोजीराजे, शाहूराजे, संताजीराजे, मुधोजीराजे, मल्हारराव होळकर, राणोजीराजे भोसले यांचीही पत्रे सुस्थितीत आहेत. काही पत्रे मोडी लिपीत असून, प्रकाश कावळे यांनी तज्ज्ञांकडून मराठी-इंग्रजी अनुवाद करवले आहेत. काही हस्तलिखिते बाळासाहेब पाटील संग्रहालयात दिली आहेत, पण बहुतेक आजही कावळे घरात सुरक्षित आहेत.

प्रकाश कावळे म्हणतात, '११ पिढ्यांनी जपलेला हा ठेवा. संशोधकांनी आले तर नवीन माहिती बाहेर येईल. आम्ही पूर्ण सहकार्य करू.' शिवरायांचे शौर्य पुस्तकांत वाचतो, पण त्यांचे मूळ हस्ताक्षर पाहणे? हा दुर्मिळ योग पैठणमध्ये अनुभवता येतो. इतिहास प्रेमींसाठी हा खरा खजिना आहे.

# आयुष्याची शेवटची सुटी...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'आयुष्याची शेवटची सुटी' हा एक इंग्रजी सिनेमा आहे. त्यातली नायिका ही सर्वार्थाने सर्वसामान्य असणारी तरुणी. त्यामुळे अर्थातच आयुष्यही सर्वसाधारणच. मात्र एक दिवस तिला अचानक असाध्य रोग असल्याचे निदान होते. मग ती ठरवते, की आपण नोकरी सोडून अजून पर्यंत जी सुटी घेणे परवडत नव्हते, त्या मोठ्ठ्या सुटीवर जायचे आणि शेवटच्या पैपर्यंत सगळे पैसे उधळून टाकायचे. ती उंची पोषाख खरेदी करते आणि एका पंचतारांकित हॉटेल मध्ये आपण श्रीमंत असल्याची बतावणी करत, उच्चभ्रू वर्तुळात वावरते. तेथे तिच्या नशिबाचे फासे पालटतात.

जुगारात जवळपास लाख डॉलर्स जिंकते. आता बतावणी करायची गरज नाही. तिला आनंद होतो. पण आता तिला कशाचच सोयरसुतक नसते. तसेच तिला आता आणखी काही गमावण्याची सुद्धा भीती नसते. म्हणून ती उरलेले आयुष्य खरेपणाने जगायचे ठरवते. ती स्वतःशी आणि इतरांशी प्रामाणिक राहते, वागते, बोलते. तिला जाणवते; आतापर्यंत, आपण आयुष्य खऱ्या अर्थाने जगलोच नाही. केवळ भविष्य आणि 'लोक काय म्हणतील?' याची चिंता करण्यात हे सुंदर आयुष्य फुकट घालवले.

ती राहिलेले दोन आठवड्याचे आयुष्य सच्चेपणाने जगायला सुरूवात करते. आणि अचानक तिला कळते की तिचे रिपोर्ट्स चुकीचे आहेत. तिला कसलाही आजार नाही व ती एवढ्यात मरणार नाही. तिच्या आनंदाला पारावार राहत नाही. पण या शेवटच्या सुटीने शिकवलेला धडा, ती कधीच विसरत नाही. तिला तिची नोकरी आणि प्रियकर दोन्ही परत मिळतात.

फिल्मी भाग सोडला, तर नायिकेच्या या आयुष्याचा प्रवास खरोखर विचार करायला लावणारा होता.

आपणही आजचा नी आत्ताचा क्षण कधी भरभरून जगतच नाही. मनात कायम उद्याची चिंता, काही तरी अशाश्वत मिळवण्यासाठी. कायम हातचे सोडून पळत्यापाठी, जीवाच्या आकांताने पळत रहातो. इतरांपेक्षा मागे पडू नये म्हणून मनाविरुद्ध जगाच्या शर्यतीत सहभागी होतो. सगळा आनंद, सगळी मजा, एखाद्या सुटीत उपभोगण्यासाठी, शिलकीत टाकत जातो. आणि हे सगळे व्यर्थ आहे. जे खरोखर हवे होते; आनंद, समाधान हे या कशात नव्हतेच. हे कळायच्या आतच शेवटची सुटी लागते. शिलकीतील पुंजी तशीच राहून जाते. न वापरलेली, कोरीच्या कोरी. पण आता निरुपयोगी.

आपण सर्वजण नेहमी वयाच्या ५५-६० पर्यंत काम करत, पैसे कमावत व वेगवेगळ्या जबाबदाऱ्या संभाळत धावत राहतो. मनात विचार असतात, की आता तरुण आहोत, तोपर्यंत काम करूया. नंतर रिटायर झाल्यावर आपल्या 'शेवटच्या सुटीत' आपापले छंद, आवडीप्रमाणे वागू-जगूया, पण तोपर्यंत आपली ताकद कमी झालेली असते. बऱ्याच जणांना त्यावेळी वेगवेगळ्या व्याधी जडलेल्या असतात. वयोमानानुसार आपल्यावर बरीच बंधने आलेली असतात व 'शेवटच्या सुटीत' करण्याचे बरेच मनसुबे हे प्रत्यक्षात येतच नाहीत, वा मनातच राहून जातात. या 'शेवटच्या सुटी'पर्यंत वाट न पाहता प्रत्येक क्षण, त्याचवेळी, त्याच क्षणात चिंता व भयमुक्त जगून घेतला तर? तर प्रत्येक क्षण त्या 'सुटी' इतकाच आनंद देईल व सर्वांचे जीवन खरच सुंदर व आनंदी होईल.

# अहंकार...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'आई मुद्दाम घरातली महागडी भांडी फोडते, तिला आश्रमात सोडा.' सुनेने नवऱ्याला भडकवले... पण आईच्या मृत्यूनंतर जेव्हा तिचा 'डोळ्यांचा रिपोर्ट' समोर आला, तेव्हा लेक ढसाढसा रडला...

छत्रपती संभाजीनगरच्या उल्कानगरी भागात 'अनिकेत' आणि त्याची बायको 'पूजा' राहत होते. अनिकेत एका खासगी कंपनीत नोकरीला होता. त्याच्या पाठीवर स्वतःच्या आईची, 'कावेरीबाईंची' जबाबदारी होती. कावेरीबाई अत्यंत साध्या आणि शांत स्वभावाच्या होत्या. लग्नाला ५ वर्षे झाल्यानंतर आता कुठे पूजा गरोदर होती, त्यामुळे घरात आनंदाचे वातावरण होते. पण जसजसे पूजाचे महिने वाढत होते, तसतशी तिची चिडचिड वाढू लागली. तिला सासूचा घरात वावरणे नकोसे वाटू लागले होते. कावेरीबाईंकडून चुकून काही ना काही चुका व्हायच्या. कधी त्यांच्याकडून पाण्याचा ग्लास सांडायचा, तर कधी जेवणात मीठ कमी-जास्त व्हायचे.

एके दिवशी रविवारी पूजाच्या मैत्रिणी घरी आल्या होत्या. कावेरीबाई त्यांच्यासाठी चहा घेऊन गेल्या, पण त्यांचा पाय अडखळला आणि ५ हजार रुपयांचा तो महागडा टी-सेट फरशीवर पडून फुटला. पूजाचा संताप अनावर झाला. मैत्रिणी गेल्यावर तिने अनिकेतसमोर घर डोक्यावर घेतले.

'अनिकेत, मी आता या बाईचा त्रास सहन करू शकत नाही. या मुद्दाम माझे महागडे सेट फोडतात. त्यांना नीट चालताही येत नाही, आंधळ्यासारख्या वावरतात घरात. माझ्या पोटात बाळ आहे, उद्या माझ्या अंगावर गरम चहा सांडला तर? एकतर ही म्हातारी घरात राहील किंवा मी माहेरी जाईन. उद्याच्या उद्या यांना आश्रमात सोडून ये.'

अनिकेतने बायकोची समजूत काढायचा प्रयत्न केला, पण पूजा ऐकायला तयार नव्हती. शेवटी, स्वतःच्या सुखी संसारासाठी आणि बायकोच्या हट्टापायी अनिकेतने स्वतःच्या आईला दूर करण्याचा कठोर निर्णय घेतला.

तो काळजावर दगड ठेवणारा दिवस दुसऱ्या दिवशी सकाळी अनिकेतने कावेरीबाईंची बॅग भरली. गाडीत बसताना कावेरीबाई काहीच बोलल्या नाहीत. गाडी एका मोठ्या 'वृद्धाश्रमाच्या' गेटवर थांबली. अनिकेत नजर चोरत म्हणाला, की 'आई... पूजाची डिलिव्हरी होईपर्यंत तू येथेच राहा. तिला थोडा त्रास होतोय. मी तुला न्यायला येईन.' कावेरीबाईंनी अत्यंत शांतपणे अनिकेतच्या डोक्यावरून हात फिरवला आणि हसून म्हणाल्या, की 'बाळा, स्वतःची आणि पूजाची काळजी घे. माझ्या नातवाला जन्मताना काही त्रास होऊ देऊ नकोस. मी सुखात राहीन येथे.' अनिकेतने घाईघाईने फॉर्म भरला आणि तो मागे न बघता निघून गेला.

९ महिन्यांनंतर तो सत्याचा स्फोट आणि अश्रूंचा महापूर नऊ महिने उलटले. पूजाने एका गोंडस मुलाला जन्म दिला. अनिकेत खूप आनंदात होता. त्याने सगळीकडे पेढे वाटले. पण त्याच्या लक्षातही आले नाही की या ९ महिन्यांत तो एकदाही आईला भेटायला गेला नव्हता. बाळाच्या जन्माबरोबर चौथ्या दिवशी अनिकेतला आश्रमातून फोन आला 'अनिकेत, तुझ्या आईचे काल रात्री झोपेतच हृदयविकाराने निधन झाले आहे. तिचे सामान घेऊन जा.' अनिकेतच्या आनंदावर विरजण पडले. तो धावत आश्रमात गेला. अंत्यसंस्कार पार पडल्यानंतर आश्रमाच्या मॅनेजरने अनिकेतच्या हातात एक 'कापडी पिशवी' ठेवली. मॅनेजर अत्यंत जड आवाजाला म्हणाला, की 'अनिकेत, तुझ्या आईने ही पिशवी नातवासाठी ठेवली होती.'

अनिकेतने ती पिशवी उघडली. आत कावेरीबाईंच्या सर्वांत मऊ आणि जुन्या साड्यांपासून हाताने शिवलेली एक सुंदर 'गोधडी' (लहान बाळाचे पांघरूण) होती. त्या गोधडीवर कावेरीबाईंचा एक 'तुटलेला चष्मा' आणि एका मोठ्या आय-हॉस्पिटलचा रिपोर्ट होता. अनिकेतने तो रिपोर्ट वाचला आणि त्याच्या पायाखालची जमीनच सरकली. तो रिपोर्ट कावेरीबाईंच्या डोळ्यांचा होता, ज्यात स्पष्ट लिहिले होते की त्यांना 'ॲडव्हान्स मोतीबिंदू' झाला होता आणि त्यांची ९० टक्के दृष्टी गेली होती.

मॅनेजर रडत म्हणाला, की 'अरे निर्लज्जा, तुझी आई घरातली भांडी मुद्दाम फोडत नव्हती... तिला खरोखर काही दिसत नव्हते. एक वर्षापूर्वी तुझ्या आईने डोळ्यांच्या ऑपरेशनसाठी लोकांचे कपडे शिवून ५० हजार रुपये साठवले होते. पण जेव्हा पूजा गरोदर राहिली आणि सुरूवातीला तिला ब्लीडिंगचा त्रास झाला, तेव्हा हॉस्पिटलमध्ये डिपॉझिट भरायला तुझ्याकडे पैसे नव्हते. तेव्हा तुझ्या या आंधळ्या आईने स्वतःच्या ऑपरेशनचे ते ५० हजार रुपये तुझ्या नकळत तुझ्या बॅगेत ठेवले होते.' अनिकेतचा श्वास कोंडला गेला. त्याचे हात थरथर कापू लागले.

मॅनेजर पुढे म्हणाला, की 'तुझ्या आईने स्वतःचे डोळे अंधारात ढकलले, फक्त तुझ्या बायकोचा आणि बाळाचा जीव वाचवण्यासाठी. ती गोधडी शिवताना तिची बोटे सुई टोचून रक्तबंबाळ झाली होती, कारण तिला काहीच दिसत नव्हते. पण तरीही ती हसत हसत नातवासाठी ती गोधडी शिवत होती. आणि तू... तू तिलाच घरातून हाकलून दिलेस.'

## अहंकाराचा शेवट आणि न संपणारा पश्चात्ताप

ते भयानक सत्य ऐकताच अनिकेत तिथेच आश्रमाच्या फरशीवर कोसळला! तो ती रक्ताचे डाग असलेली गोधडी आणि आईचा तुटलेला चष्मा छातीला लावून लहान मुलासारखा ओक्साबोक्शी रडू लागला. ज्या आईला त्याच्या बायकोने 'अडगळ' आणि 'आंधळी' म्हणून हिणवले होते, त्याच आईने स्वतःचे डोळे गमावून तिच्या बाळाला जीवनदान दिले होते. आज अनिकेतकडे स्वतःचे बाळ होते, सुखी संसार होता... पण ज्या माऊलीने स्वतःच्या आयुष्याचा अंधार करून त्याच्या घरात वंशाचा दिवा लावला, त्या आईचे पाय धरून माफी मागायला ती आई आता या जगात राहिली नव्हती. आई-वडिलांच्या वाढत्या वयातील चुकांना 'कटकट' समजणाऱ्या आणि बायकोच्या सांगण्यावरून त्यांना वाऱ्यावर सोडणाऱ्या आजच्या पिढीच्या काळजाला हात घालणारी ही कथा तुम्हाला कशी वाटली?

# लंच-डीनर में भूख को दोगुना कर देगी यह लाजवाब स्वीट पोटैटो करी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सकरकंद को आमतौर पर हम सिर्फ उबालकर या भूनकर चाट की तरह खाते हैं, लेकिन जब इसे मसालों और नारियल के दूध या दही की ग्रेवी के साथ पकाया जाता है, तो यह एक 'रॉयल डिश' जैसा स्वाद देती हैं। यह करी विटामिन-ए और फायबर से भरपूर है, जो स्वाद के साथ सेहत का भी पूरा ख्याल रखती है। आइए जानते है इस लाजवाब करी को बनाने की आसाना रेसिपी।

**स्वीट पोटैटो करी बनाने के लिए सामग्री**

- २ मध्यम आकार के शकरकंद (क्यूब्स में कटे हुए)
- १ बारीक कटा हुआ प्याज और टमाटर
- १ कप नारियल का दूध (या फेंटा हुआ दही)
- अदरक-लहसून का पेस्ट
- मसाले : हल्दी, लाल मिर्च, धनिया पाउडर और गरम मसाला
- तडके के लिए : राई, कढीपत्ता और हरी मिर्च

**स्वीट पोटैटो करी बनाने की विधि**

- सबसे पहले एक कडाही में तेल गरम करें । इसमें राई, कढीपत्ता और हरी मिर्च का तडका लगाएं। अब प्याज डालकर सुनहरा होने तक पेस्ट डालें और फिर टमाटर के साथ सुभी सूखे मसाले मिला दे। जब मसाला तेल छोडने लगे, तो समझ लीजिए बेस तैयार हैं।
- अब कटे हुए शकरकंद डालें और थोडा पानी डालकर इसे ढक्कन लगाकर ५-७ मिनट तक पकने दें ।
- जब शकरकंद नरम हो जाएं, तो इसमें नारियल का दूध या दही डालें । धीमी आंच पर २ मिनट पकाएं और ऊपर से हरा धनिया छिडक दे।
- इस गरमा-गरम करी को आप जीरा राइस या मिस्सी रोटी के साथ परोसें। यकीन मानिए, इसकी खुशबू ही घर वालों की भूख को दोगुना कर देगी ।



शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हाऊस पारोळा रोड, धुळे




# श्रीराम नवमीनिमित्त अमळनेरात मंगलमय वातावरणात श्रीराम जन्मोत्सव साजरा




अमळनेर : श्रीराम मंदिरात श्रीराम नवमीनिमित्त भाविकांची दर्शनासाठी झालेली गर्दी.

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील श्रीराम मंदिरात श्रीराम नवमीनिमित्त गुरुवार, दि. २६ मार्च रोजी पारंपरिक व भक्तीमय वातावरणात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात पार पडला. श्रीमंत प्रताप शेठ अग्रवाल यांच्या परिवारातर्फे आयोजित भजन व कीर्तनाच्या कार्यक्रमामुळे श्रीराम जन्मोत्सवाला विशेष रंगत आली.

सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. मंदिरावर आकर्षक फुलांची सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली होती. भक्तांनी शिस्तबद्ध रांगेत उभे राहून श्रीरामांचे दर्शन घेतले. बुधवार, दि. २५ व गुरुवार, दि. २६ मार्च रोजी दुपारी ४ ते ७ या वेळेत कीर्तन कार्यक्रमात राजीव कृष्णाजी झा महाराज यांच्या अमृतमय वाणीतून श्रीराम कथा सादर करण्यात आली. या कीर्तनाचा मोठ्या संख्येने भाविकांनी लाभ घेतला. गुरुवार, २६ मार्च रोजी सकाळी सव्वानऊ वाजता श्रीराम जन्मोत्सव कथा पार पडली. दुपारी १२ वाजता श्रीराम जन्मोत्सव सोहळा मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात आला. यावेळी " जय श्रीराम "च्या घोषणांनी संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमला होता. उत्सवानिमित्त भाविकांना प्रसाद व शितपेयांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन श्रीमंत प्रताप शेठजी यांचे पणतू चि. मिलिंद महेश अग्रवाल, मयंक महेश अग्रवाल व अग्रवाल परिवारातील सदस्यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. सेवेकरी जितेंद्र चौधरी, पुजारी सारंग कुळकर्णी, मंदिर कर्मचारी महेंद्र परदेशी, गणेश चौधरी, सत्यवान महाजन आदींनी सहकार्य केले. येथील श्रीराम मंदिर हे भाविकांचे प्रमुख श्रद्धास्थान आहे. सन १९४२ मध्ये या मंदिराची स्थापना झाली आहे. या मंदिरात आदी शंकराचार्य यांची मूर्ती स्थापित आहे. हे मंदिर पाच मजली वास्तुशिल्पामुळे विशेष आकर्षण ठरते. दानशूर उद्योगपती श्रीमंत प्रताप शेठ अग्रवाल यांनी अमळनेर शहराच्या विकासात मोठा वाटा उचलला आहे. तत्त्वज्ञान व समाजसेवेत त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्यांच्या प्रेरणेने मंदिर व परिसराचा विकास होत असून भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. श्रीराम भक्तांच्या वतीने मंदिराच्या पुढील विकासासाठी दानशूर व्यक्तींनी पुढे यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. स्वेच्छेने सेवा किंवा मदतीसाठी श्रीराम मंदिरचे विश्वस्त मिलिंद अग्रवाल (मो. 7875556589) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



अमळनेर : प्रभू श्रीराम नवमीनिमित्त श्री मंगळग्रह मंदिरात विधिवत पूजन करताना व्यावसायिक रणजित पाटील, सौ. सरिता पाटील व उपस्थित भाविक.

## श्री मंगळग्रह मंदिरात मंगलमय वातावरणात श्रीराम जन्मोत्सव

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिरात श्रीराम नवमीनिमित्त गुरुवार, दि. २६ मार्च रोजी मंगलमय वातावरणात श्रीराम जन्मोत्सव साजरा झाला. यावेळी भाविकांची मोठी गर्दी होती. व्यावसायिक रणजीत पाटील व सौ. सरिता रणजीत पाटील यांच्या प्रमुख यजमान होते.

रणजित पाटील यांच्या हस्ते सपत्निक प्रधान संकल्प, गणपती पूजन व पुण्याहवाचन झाले. श्रीराम स्वरूप भगवान श्रीकृष्णांचा अभिषेक झाला. त्यानंतर दुपारी १२ वाजता मंगलध्वनींच्या सुरात भगवान श्रीरामांचा जन्मोत्सव साजरा झाला. भाविकांच्या उपस्थितीत भक्तीमय वातावरणात पाळणागीत झाले. जयेंद्र वैद्य, तुषार दीक्षित, गणेश जोशी, यतीन जोशी, मेहूल कुळकर्णी, वैभव लोकाक्षी यांनी पौरोहित्य केले. दरम्यान, मंदिरात दिवसभर भाविकांची प्रभू श्रीरामांच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली होती.

## श्रीराम अवताराचे १० गूढ आध्यात्मिक अर्थ

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



श्रीराम कथा ही केवळ इतिहास किंवा पुराणकथा नाही, तर अंतर्मनातील आध्यात्मिक प्रवासाचा नकाशा आहे. प्रत्येक घटना ही आपल्या आत घडणाऱ्या प्रक्रियेचे प्रतीक आहे.

**१) श्रीराम = आत्मस्वरूप (आत्माराम)**
श्रीराम म्हणजे बाहेरचा राजा नव्हे, तर आपल्या आतले शुद्ध, साक्षी, शांत अस्तित्व.
जेव्हा आपण स्वतःला ओळखतो, तेव्हा 'श्रीराम प्रकट होतो'.

**२) सीता = शुद्ध बुद्धी / अंतःकरण**
सीता माता या शुद्धता, प्रेम आणि निर्मळ बुद्धीचे प्रतीक आहे.
आत्मा (श्रीराम) आणि बुद्धी (सीता माता) एकत्र असतील तर जीवन संतुलित असते.

**३) रावण = अहंकार आणि वासनांचा समूह**
रावणाचे १० मस्तक = १० इंद्रियांचे विकार (काम, क्रोध, लोभ).
हा अहंकारच आत्म्यापासून आपल्याला दूर नेतो.

**४) लक्ष्मण = विवेक**
लक्ष्मण म्हणजे सजगता आणि योग्य-अयोग्य ओळखण्याची शक्ती.
आत्म्याच्या मार्गावर विवेक नेहमी सोबत असतो.

**५) हनुमानजी = भक्ती आणि प्राणशक्ती**
हनुमानजी म्हणजे पूर्ण समर्पण, श्रद्धा आणि अंतर्गत ऊर्जा.
भक्तीमुळेच आत्मा आणि बुद्धी (श्रीराम-सीता) पुन्हा एकत्र येतात.

**६) वनवास = अंतर्मुख साधना**
श्रीरामांचा वनवास म्हणजे बाह्य सुखांचा त्याग करून स्वतःकडे वळणे. खरा शोध बाहेर नाही, आत आहे.

**७) लंका = मनातील माया आणि मोह**
लंका म्हणजे सोन्यासारखी आकर्षक पण बांधून ठेवणारी माया.
आपण बाह्य आकर्षणात अडकतो, तेव्हा सत्य हरवते.

**८) सेतू बांधणे = साधनेचा मार्ग**
रामसेतू म्हणजे ध्यान, जप, साधना.
जे आपल्याला मायेपासून (लंका) सत्याकडे (श्रीराम) नेतो.

**९) रावणवध = अहंकाराचा अंत**
रावणाचा वध म्हणजे बाह्य युद्ध नव्हे, तर स्वतःच्या अहंकारावर विजय.

**१०) अंतर्मन चिंतन**
'माझ्या आतला रावण अजून जिवंत आहे का?'
'मी रामाकडे (सत्याकडे) चाललोय का?'

---

## श्रीराम म्हणजे काय?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

- उगीचच झोपतो त्याला 'आ राम' म्हणतात.
- झोपलेला परत कधी उठतच नाही त्याला 'हे राम' म्हणतात.
- मित्रासारखा वागतो म्हणून 'सखा राम' म्हणतात.
- जो राजालाही आदर्श होऊन राहतो त्याला 'राजा राम' म्हणतात.
- हृदयीचे जाणतो म्हणून त्याला 'आत्मा राम' म्हणतात.
- एक पत्नी व्रताप्रमाणे वागतो त्याला 'सीता राम' म्हणतात.
- भगवंत ज्यांचे पाय पूजितो त्यांना 'तुका राम' म्हणतात.
- प्रसंगी हाती शस्त्र वा शास्त्र धरून अन्यायाशी लढतो त्याला 'परशु राम' म्हणतात.
- जो अखंडपणे भगवंताचा दास होऊन राहतो त्याला 'राम दास' म्हणतात.
- हल्लीच्या युगात जो पहाटे उठवतो त्याला 'आला राम' म्हणतात.
- जो सेवाव्रताने वागतो त्याला 'सेवा राम' म्हणतात.
- जो प्रसादाचा गोड मेवा बनवतो त्याला 'मेवा राम' म्हणतात. आणि हे ज्यांना कळले त्यांच्यासाठी 'राम राम' म्हणतात. हे वाचणारा सोळा वेळा राम म्हणाला मोजलेत ना? आता एकूण वीस वेळा राम राम झाले. चला, एकवीस वेळा रामनाम तर घडले. ।जय श्रीराम।

## श्रीराम जय राम जय जय राम

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

- श्री रामजन्म झाला चैत्र नवमीला
- रा घव कुळास आनंद जाहला।।
- म नी दशरथ कृत कृत झाला
- ज न्मा आले चार पुत्र म्हणुनिया!
- य यज्ञ सफलता पुत्र कामेष्टीला
- रा म रूपे विष्णू पोटी जन्मा आला!
- म हा पराक्रमी उन्मत्त रावणा
- ज न त्रस्त झाले प्रार्थी नारायणा!
- य ज्ञ विध्वंसिती ऋषींचे असुर
- ज न्म घेती विष्णू करण्या संहार!
- य क्ष देव सारे होऊनी वानर
- रा म स्विकारती वनवास घोर!
- म र्दीला रावण सीता मातेसाठी विजयी होऊनी अयोध्येस येती! अधर्म माजतो पृथ्वीवरी जेव्हा देव जन्म घेती मनुरूपे तेव्हा ।।

## लक्ष्मी मातेला प्रसन्न करण्यासाठी करा हे उपाय

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



शुक्रवारी सकाळी अंघोळ वगैरे केल्यानंतर पांढरे वस्त्र परिधान करावे. यासोबतच देवी लक्ष्मी मातेची विधिवत पूजा करून त्यांना कमळाचे फूल अर्पण करावे.
कडनिंबाच्या झाडाला पाणी अर्पण करा. कडुनिंबाला दुर्गा मातेचे रूप मानले जाते. या कारणास्तव तिला निमारी देवी असेही म्हणतात. यासोबतच ग्रह दोषांपासूनही आराम मिळतो. म्हणूनच शुक्रवारी सकाळी स्नान वगैरे केल्यानंतर कडुनिंबाच्या झाडाला जल अर्पण करावे.

**पांढऱ्या वस्तू दान करा**
शुक्रवारी लक्ष्मी मातेची पूजा करण्यासोबतच पांढऱ्या रंगाच्या वस्तू दान करा. कारण हा रंग देवी लक्ष्मी मातेला अतिशय प्रिय आहे. म्हणूनच शुक्रवारी पांढरे वस्त्र, तांदूळ, मैदा, साखर, दूध, दही इत्यादींचे दान करा.

**या मंत्रांचा जप करा**
शुक्रवारी भगवान शुक्राला प्रसन्न करण्यासाठी यापैकी कोणत्याही एका मंत्राचा सुमारे १०८ वेळा जप करा. 'ओम शुं शुक्राय नमः' या ओम हिमकुंडमृणालाभन दैत्यानान परम गुरुं सर्वशास्त्र प्रवर्तकं भार्गवम् प्रणमायहन.

**साखरेचे द्रावण**
प्रत्येक कामात काही अडथळे येत असतील तर लक्ष्मी मातेची पूजा करण्यासोबतच शुक्रवारी काळ्या मुंग्यांना साखर खाऊ घाला. याचा फायदाही तुम्हाला मिळेल.

## श्रीरामरक्षा प्रश्नमंजुषा



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**१) रामरक्षेचे रचयिता कोण आहेत?**
बुधकौशिक. विश्वामित्र ऋषी

**२) श्रीरामरक्षेत श्रीराम हा शब्द किती वेळा येतो? :** ८०

**३) मंत्र म्हणजे काय?**
मननात त्रायते इति मंत्र. ज्याचे मनन केले असता तो तारून नेतो तो मंत्र होय. मंत्र म्हणजे एक ध्वनी, एक शब्द, एक अक्षर किंवा अनेक शब्दांचा एकत्रित समूह...ज्यांच्या पुनरुच्चारणाने भौतिक, आत्मिक व आध्यात्मिक उन्नती होते. म...हे अक्षर. मानवी मनाचे प्रतीक आहे. जे मनन अथवा चिंतन करण्यास सक्षम बनवते व त्र म्हणजे संरक्षण करण्याची ताकद ज्या मंत्रात आहे .ज्याच्या उच्चाराने पवित्र उर्जा स्पंदने निर्माण होतात व आत्मिक सुख मिळते.

**४) रामरक्षा कवचाचे नाव काय?**
उत्तर : रामरक्षा...रक्षा म्हणजेच कवच होय.

**५) श्रीरामरक्षा कवचात किती आणि कोणकोणत्या अवयवांचा उल्लेख आला आहे?**
उत्तर : २२ - शीर, भाळ, डोळे, कान, नाक, मुख जिव्हा, कंठ, खांदा, भूज, टाळू, हृदय, छाती, पोटाचा मध्यभाग (पाणथरी), नाभी, कंबर, हात, गुढघे, जांघा, पोटऱ्या, पाऊल, मांड्या...इत्यादी.

**६) तुम्हाला समजलेली श्रीरामरक्षा सारांश रूपाने लिहा.**
उत्तर : भगवान शंकर यांनी बुधकौशिक ऋषींच्या स्वप्नात येऊन सांगितलेली श्रीरामरक्षा सर्व पापांचा नाश करणारी, भक्तांच्या सर्व इच्छा पूर्ण करणारी आहे, सर्व अवयवांचे रक्षण करणारी आहे. या श्रीरामरक्षा कवचाने पठण कर्ता सुखी, पुण्यवान, विजयी विनयी होऊन सर्व कार्य सिद्धीस जाणार असून, त्याला मुक्ती मिळणार आहे. रामरक्षारूपी संरक्षक कवचामुळे सर्वत्र मंगलमय होते.
सतत पुढे जाणारा, कधीही न संपणारा बाण व भाता ज्यांच्याजवळ आहे असे श्रीराम आपले रक्षण करण्यासाठी सतत आपल्या सवे असणार आहेत. तेच मार्गदर्शक आहेत. दुःख, संकटांचा नाश करणाऱ्या, सुख-समृद्धी देणाऱ्या श्रीरामांच्या रक्षेचे कवच सदा सर्वकाळ आपले रक्षण करेल.

**७) श्रीरामरक्षेत रामाशिवाय आणखी किती कोणकोणत्या व्यक्तींचा उल्लेख आला आहे?**
उत्तर : २२, सीता, हनुमान, लक्ष्मण, दशरथ, कौसल्या, विश्वामित्र (बुधकौशिक ऋषी), सौमित्रिवत्सल (सुमित्रा तिचे पुत्र ) शत्रुघ्न, भरत, सुग्रीव, जाम्बुवंत, बिभिषण, रावण, शंकर (आदिष्टवान), वाल्मिकी, परशुराम (जमदग्नी पुत्र), दुर्वात्मज, पद्माक्ष, पितवासकं, सत्यसंध, लक्ष्मण, रघुकुलतिलकम्

**८) श्रीरामरक्षेतील तुम्हाला आवडलेला श्लोक कोणता?**
उत्तर : श्लोक- आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम्।
लोकाभिरामं श्रीरामं भूयोभूयो नमाम्यहम् ।।३५।।

**९) श्रीरामरक्षेच्या ध्यान श्लोकाच्या आधारे श्रीरामांचे ध्यान कसे करता येईल?**
उत्तर : ध्यान ही अष्टांग योगाची शेवटची अवस्था होय. रामरक्षेच्या ध्यान श्लोकानुसार मन स्थिर, निर्विचार करण्यासाठी विष्णूचा ७ वा अवतार असलेल्या अजानुबाहू, पद्मासनात असलेल्या, पितवस्त्र परिधान केलेल्या सूर्यविकासी कमलदलासारखे नेत्र असलेल्या, ज्यांच्या डाव्या मांडीवर सीता बसली आहे अशा श्रीरामचंद्रांची मूर्ती अंतःचक्षुंसमोर आणून प्रज्ञावान अशा श्रीरामरक्षेचे दररोज, नियमित, प्रसन्न अशा प्रातःकाळी, दिवे लागणीच्या शुभ समयी अथवा दिवसांच्या कोणत्याही प्रहरी, अडचणीत असताना, अनाकलनीय भीतीने मनाला ग्रासले असताना, एकांतवासात असताना श्रीरामरक्षेचे पठण करावे. रोज ११ वेळा करावे.
ते करत असताना तटस्थ राहून दृष्टी विशाल होण्यासाठी निःशंक मनाने व पूर्ण आत्मनिष्ठेने...नकारात्मकतेला मनात स्थान न देता एकाग्रता साधण्याचा प्रयत्न करुन श्रीरामाचे ध्यान करणे...नव्हे तर ही एकाग्रता म्हणजेच ध्यान व ध्यानाचे फळ होय...अथ ध्यानम्.

**१०) श्रीरामरक्षेत श्रीरामांसाठी आलेली विशेषणे कोणती? त्यापैकी एकाचे स्पष्टीकरण करा.**
जितेंद्रिय, लोकाभिराम, रणरंगधीर, राजीवनेत्र, रघुवंशनाथ, कारुण्यमूर्ती, करुणाकर, पुराणपुरुषोत्तम, जानकीवल्लभ, रामभद्र, रामचंद्र, प्रजापती, रघुनाथ, भरताग्रज, रघुनंदन, माता, पिता, स्वामी, मित्र, अजानुबाहू--
अक्षयाशुगनिषङ्गशङ्गिनौ- अक्षय-कधिही न संपणारा +आशुग -पुढेपढे जाणारा बाण
निषङ्ग संङ्गिनौ भाता जवळ असलेले असे श्रीराम. (सहलक्ष्मण).

**११) श्रीरामरक्षेचा छंद कोणता?**
उत्तर : अनुष्टुप छंद

**१२) श्रीरामरक्षेतील कोणत्या श्लोकात श्रीराम या शब्दाची सर्व विभक्ती रूपे आली आहेत?**
उत्तर : रामो राजमणीः सदा विजयते रामं रमेशं भजे।
रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नमः।
रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोऽस्म्यहं।
रामे चित्तलयः सदा भवतु भो राम मामुद्धरः।।३७।।

**१३) श्रीरामरक्षेचा प्रचार व्हावा म्हणून तुम्ही काय कराल?**
उत्तर : पाठांतरक्षम वयापासून शिबीर.
सामुदायिक पाठांतर : - नियमित संथा देणे
- पाठांतर स्पर्धा आयोजन

**१४) श्रीरामरक्षेत एकूण श्लोक किती, कोणत्याही एक श्लोकाचा अर्थ लिहा.**
उत्तर : ३८ श्लोक

श्लोक...वज्रपन्जरनामेदं तो रामकवचं स्मरेत।
अव्याहताज्ञः सर्वत्र लभते जयमंगलम्।।१४।।
**अर्थ...श्रीरामरक्षा हे रामकवच वज्राच्या.. (लोहाच्या) पिंजऱ्याप्रमाणे संरक्षक आहे. म्हणूनच त्याला वज्रपंजर म्हटले आहे. जो श्रीरामकवचाचे नित्य स्मरण करील त्याची आज्ञा (इच्छा) कधीही अमान्य केली जाणार नाही.**

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**